# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

प्रसिद्धी पत्रक ता. ४ डिसेंबर, २०१९

## संताजी जगनाडे महाराज जयंती निमित्त

### महानगरपालिकेतर्फे विनम्र अभिवादन

नागपूरए ता.४ : श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंती निमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे उपमहापौर श्रीमती मनीषा कोठे, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, लकडगंज झोन सभापती राजकुमार सेलोकर (शाहू) यांनी जगनाडे चैक नंदनवन येथील श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुतळयाला तसेच लकडगंज झोन कार्यालय व मनपा मुख्यालयात तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी सर्वश्री कैलाश चरडे, हरीशचंद्र बोंडे, प्रमोद बारई, गिरीश महाजन, सुभाष ढबाले, सतीश महाजन, नरेंद्र बावनकर, श्याम कापसे, मिलिंद बडोले, सुर्यकांत रेवतकर, डाॅ. मालाताई चरडे, उर्मीला बोंडे आदी उपस्थित होते.